आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई २३

विषय : देशी मद्याचे वाहतूक परवाने मंजूर करतांना सोबत मागणीपत्र जोडण्याबाबत.

## परिपत्रक

क्रमांक: एफएलआर ११२००२/टीपी/सांत मुंबई १० जानेवारी २००२

महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ मधील तरतुदीनुसार सीएल-२ नमुन्यातील ठोक देशी दारु विक्रेता राज्यातील कोणत्याही देशी मद्य उत्पादकांची उत्पादने प्राप्त करुन घेऊन त्याची राज्यातील कोणत्याही जिल्हयातील सीएल-३ नमुन्यातील किरकोळ विक्रेत्यास विक्री करु शकतात.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की देशी मद्याच्या वाहतूक परवान्यासोबत सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांची मागणी पत्रक सोबत जोडण्यात येत नाहीत. त्यामुळे देशी मद्याचा माल पकडल्यानंतर सीएल-३ अनुज्ञप्तीधारक आवश्यकतेनुसार नंतर वाहतूक पास मंजूर करुन आणून दाखवितात व मद्यसाठा सोडवून घेतात.

या कार्यालयाचे वरील समक्रमांकीत दिनांक २३ नोव्हेंबर २००० च्या परिपत्रकान्वये नियमित करण्यात आलेल्या सुचनेनुसार सीएल-३ अनुज्ञप्तीधारकाने त्यांच्या मागणीपत्रावर तारीख आणि अधिकाऱ्याची प्रतिस्वाक्षरी घेण्याबाबत अनुक्रमांक ८ मध्ये केलेल्या सुचनेनुसार जिल्हयातील सीएल-२ अनुज्ञप्तीधारकाकडून मद्य प्राप्त करुन घेतांना मागणीपत्रावर प्रतिस्वाक्षरी लागणार नाही असा उल्लेख आहे. सदर सुचनेमध्ये बदल करुन खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करण्यात येत असून ते जिल्हयातील सर्व सीएल-२ व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांच्या निदर्शनास अधीक्षकांनी आणून देण्यात यावे व त्यानुसार कारवाई होत नसल्याचे आढळून आल्यास मुंबई दारुबंदी कायदा १९४९ अंतर्गत नियम ५४ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.

सर्व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांनी त्यांना खरेदी करावयाच्या देशी मद्याच्या परिमाणाची मागणी सीएल-XIII या नमुन्यातील मागणीपत्रानुसार सीएल-२ अनुज्ञप्तीधारकाकडे केल्यानंतर सीएल-२ अनुज्ञप्तीधारक नियमानुसार सीएल-XIV- नमुन्यामध्ये देशी मद्याच्या

वाहतूकीसाठी परवाना मंजूर करतात. परंतू सदर वाहतूक पासासोबत मागणी पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत नाही. तरी या पुढे जोडण्याची दक्षता घेण्यात यावी.

पुढील नुतनीकरणाच्या वर्षापासून ( दिनांक १ एप्रिल २००२ ) सर्व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांनी मागणीपत्राच्या किमान १०० प्रतींच्या प्रत्येकी तीन प्रतीमधील पुस्तक अधीक्षकांकडून प्रमाणित करुन घ्यावे. सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांनी सीएल-३ अनुज्ञप्तीचे नुतनीकरणावेळी असे मागणी पत्र अधीक्षकांकडून प्रमाणित करुन घ्यावे. मागणीपत्राच्या दोन प्रती सीएल-२ अनुज्ञप्तीधारकाकडे पाठविण्यात याव्यात. सीएल-२ अनुज्ञप्तीधारकांनी त्याची एक प्रत परिवहन पासाबरोबर पाठवून दयावी व एक प्रत त्यांनी स्वतःच्या अभिलेखावर ठेवावी. या पुढे अशा प्रकारची पध्दत अंमलात आणावी.

तसेच सीएल-२ अनुज्ञप्तीधारकांनीही मागणीपत्र संबंधीत अधीक्षकांकडून प्रमाणीत करुन घ्यावीत. त्यानाही मागणीपत्राबाबत उपरोक्त पध्दती लागू करण्यात येत आहे. या बाबत देशी दारु निर्माणीच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

मागणीपत्राबाबत अनुज्ञप्ती निहाय नोंदी अद्यावत ठेवण्याची जबाबदारी अधीक्षकांची राहील याची नोंद घ्यावी.

उपरोक्त सुचना महाराष्ट्र देशी दारु नियमावली १९७३ च्या नियम ४७ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर परिपत्रकाची पोच उलटटपाली द्यावी.

( ए. रामकृष्णन् )
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह
२. सर्व विभागीय उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क
३. मा.मंत्री व राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक यांचे माहितीकरिता
४. सर्व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क,
५. सर्व उप अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क
६. सर्व निरीक्षक / दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क
८. सर्व सीएल-२/सीएल-३ अनुज्ञप्तीधारक
९. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
१०. या कार्यालयातील कार्यासन क्रमांक १२ ( ५ प्रती )

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र. बीपीए/१०११/२५२४३/सात. दिनांक १०.१.२००२ अबकारी अनुज्ञप्तींचे सन २००२-२००३ करिताचे अनुज्ञप्ती शुल्काबाबत.

------------------ X ------------------

क्रमांक : बीपीए ११२००१/सीआर-१०/सात मुंबई १४ जानेवारी, २००२

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१) सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह

२) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क रत्नागिरी

३) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

४) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी

(ए. रामकृष्णन)
आयुक्त